**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ०१/२०२०** | **दिनांक ०३/०१/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २८/१२/२०१९ ते ०३/०१/२०२०)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक ०४/०१/२०१९ सकाळी ८:३० पासून ०८/०१/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२८/१२** | **२९/१२** | **३०/१२** | **३१/१२** | **०१/०१** | **०२/०१** | **०३/०१** | | **०४/०१** | **०५/०१** | **०६/०१** | **०७/०१** | **०८/०१** |
| ० | ० | ० | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३३.० | ३२.२ | ३२.० | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३० | ३१ | ३० | २९ | २९ |
| १७.८ | २१.१ | १८.५ | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २० | २१ | २० | २० | १९ |
| ० | २ | ० | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ० | ० | १ | ३ | १ |
| ९१ | ७१ | ८५ | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ७३ | ६१ | ६० | ६९ | ७३ |
| ४८ | ४४ | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ४० | ३४ | ३६ | ४० | ४२ |
| १.९ | ३.३ | २.२ | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ७ | ८ | १० | ४ | ३ |
| प. | वा.प. | इ. | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | इ. | इ.पू. | पु. | इ.पु. | ई.पू. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| ०.० | ०.० | **५१९७.२** |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ४ ते ८ जानेवारी २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात घट संभवत असून आकाश निरभ्र राहील.**

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **भात** | **रोपवाटिका** | • उन्हाळी भात रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **वाल** | **फुलोरा अवस्था** | • वाल पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५% प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• वाल पिक फुलोऱ्यात येण्याची व दाणे भरण्याची अवस्था ओलाव्यासाठी अति सवेंदनशील असल्याने वाल पिकास फुलोऱ्या येण्याच्या अवस्थेत पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भुईमुग** | **वाढीची अवस्था** | • भुईमुग पिकास ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **आंबा** | **पालवी व बोंगे फुटणे अवस्था** | • हवामान अंदाजानुसार आंब्याला मोहोर फुटण्यास पोषक वातावरण तयार होत असल्याने मोहोराचे तुडतुडे व भुरी रोगापासून संरक्षण करण्याकरिता आंबा मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार बोंगे फुटताना कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. + हेक्झाकोनाझोल ५% प्रवाही ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच पालवी अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर तुडतुड्यांचा तसेच करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही १० मि.ली. अधिक संयुक्त बुरशीनाशक (कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३%) १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **काजू** | **मोहोर अवस्था** | • मोहोर अवस्थेत असलेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भावामुळे मोहोर सुकून जाण्याची शक्यता असल्याने मोहोराचे ढेकण्या व फुलकिडीपासून संरक्षण करण्यासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **कलिंगड** | **वाढीची अवस्था** | • कलिंगड पिकास नत्र खताचा दुसरा हप्ता ११ ग्रॅम युरिया प्रती आळ्यास व २० ग्रॅम युरिया प्रती संकरीत कलिंगडाच्या आळ्यास लागवडीनंतर एका महिन्यांनी देण्यात यावा. |
| **भेंडी** | **वाढीची अवस्था** | • भेंडी पिकावर पाने खाणाऱ्या भुंग्यांचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३०% प्रवाही १० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **मिरची** | **फुलोरा अवस्था** | • मिरची पिकास नत्र खताचा दुसरा हप्ता ६५ किलो युरिया प्रती एकरी या प्रमाणात पिक फुल व फलधारण्याचा वेळी देण्यात यावा.<br>• मिरची पिकावर रसशोषक किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३०% प्रवाही १० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच पिकामध्ये पिवळे चिकट कागदाचे सापळे लावावेत. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | **-** | • किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस जनावरांच्या गोठयात गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे व दिवसा गोठयाची दारे व खिडक्या खुली ठेवावीत जेणे करून हवा खेळती राहील. |
| **कुकुटपालन** | **-** | • किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**